अपिल/सही

0/c माहिती अधिकार

माहिती अधिकार

महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालय,
कोंढवा-येवलेवाडी,पुणे महानगरपालिका.
कार्यालयाचा पत्ता :- जे.एस.पी.एम.बिल्डींग,
सावंत कॉर्नर,कात्रज, पुणे-४६.
कार्यालयाचा संपर्क क्र.:- ०२०-२५५०८८००
ईमेल :kondhwa@punecorporation.org
विस्तारित क्रमांक :- ०२०-२५५०८८०२/०३

जावक क्र. :- 2LLS दिनांक :- 20-L-28

अपिल प्राधिकारी तथा महा.सहा.आयुक्त, कोंढवा-येवलेवाडी
पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय

अपिल क्र.:अ.प्रा.तथा महा.सहा.आयुक्त कार्यालय कोंढवा-येवलेवाडी /पुणे मनपा/अपिल/४०४९ दि १४/०८/२०२४

१. अपिलकर्ता
श्री.संदीप पवार
राहणार :- पर्ल रेसिडेन्सी फलॅट क्र. ०८,
सर्वे क्र. ३६/३ई/२, गोकुळनगर(स्वामी समर्थ नगर ),
चितळे डेअरी शेजारी, कात्रज – कोंढवा रोड,
कात्रज, पुणे ४११०४६

२. श्री. विजय नेवसे , जन माहिती अधिकारी तथा,
सहाय्यक उद्यान अधिक्षक, वृक्ष प्राधिकरण विभाग
पुणे महानगरपालिका.

श्री. संदीप पवार
विरूध्द
श्री. विजय नेवसे जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक उद्यान अधिक्षक, पुणे महानगरपालिका.

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(१) अन्वये अपिल**

अपिलकर्ता श्री. विजय नेवसे यांचा माहिती अधिकार अर्ज आ.क्र. २०३० दिनांक १८ /०६/२०२४ रोजी कोंढवा येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालयाकडे प्राप्त झाला. सदर अर्जात ऑनलाईन टोकन अन्वये सोबत जोडले प्रमाणे दि. ६/०५/२०२३ रोजी पुणे मनपाच्या वेवसाईटवर व माननीय कार्यालयात सोबत जोडले प्रमाणे दि. २५/०४/२०२४ रोजी आमच्या गृहनिर्माण हौसिंग सोसायटीच्या दुतर्फा पुणे मनपाच्या वतीने लावलेल्या झाडांच्या फांद्या अस्ताव्यस्त वाढल्याने छटनी करून मिळणे बाबत अर्ज दाखल केला होता. सदर अर्जावर आज पर्यंत केलेल्या / झालेल्या कार्यवाहीचा सर्व अभिलेख उपलब्ध करून मिळणेबाबत अर्ज दाखल केला आहे. सदर अर्जाची माहिती उपलब्ध करून न दिल्यामुळे जा.क्र. २४८७ दि. १२/०८/२०२४ रोजी स्मरणपत्र पाठविण्यात आले.

माहिती अर्जाच्या अनुषंगाने जनमाहिती अधिकाऱ्याने उपलब्ध करून दिलेली माहिती व इतर पत्र व्यवहारासंबंधी माहिती खालीलप्रमाणे आहे.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| माहिती अधिकारातर्गत अर्ज सादर केल्याचा दिनांक | माहिती उपलब्ध करून द्यावयाचा अंतिम दिनांक | अपिलार्थी उत्तर पाठविल्याचा दिनांक | अर्जदाराने शुल्क भरल्याचा दिनांक | अर्जदारास माहिती दिल्याचा दिनांक |
| १८/०६/२०२४ | १८/०७/२०२४ | उत्तर दिले नाही | निरंक | उत्तर दिले नाही |

**प्रथम अपिल अर्ज दाखल करण्याचे कारण** – श्री. संदीप पवार यांनी अपिल अर्जात पुढीलप्रमाणे नमूद केले आहे- "अर्जामधील माहिती देण्याची मुदत संपूनही माहिती न मिळाल्याने सदरचे अपील"

| प्रथम अपिल अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रथम अपिल अर्ज दाखल करावयाचा अंतिम दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज मुदतीत दाखल केला आहे का ? | प्रथम अपिलाच्या विलंबाबाबत निवेदन दिले आहे का ? | प्रथम अपिल सुनावणी सुचना पाठविल्याचा दिनांक |
| १८/०८/२०२४ | १४/०८/२०२४ | होय | - | ३०/०८/२०२४ |

प्रथम अपिल सुनावणी दिनांक व वेळ :- दि. ३०/०८/२०२४ रोजी दुपारी १२.०० वाजता

सुनावणीस अपिलकर्ता :- उपस्थित

सुनावणीस जनमाहिती अधिकारी :- उपस्थित

जनमाहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीचा तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | अर्जदाराने मागितलेली माहिती | जनमाहिती अधिकाऱ्याने दिलेले उत्तर/माहिती |
|---|---|---|
| १ | उद्यान विभागाकडील कलम ४ (ख ) मधील १७ मुद्यांची माहिती मिळणे बाबत केलेल्या माहिती अधिकार अर्जातील माहिती न मिळाल्यामुळे प्रथम अपील अर्ज दाखल केला आहे. | नाही.<br>सदर अर्जांची माहिती उपलब्ध करून न दिल्यामुळे जा.क्र. २४८७ दि. दि. १२/०८/२०२४ रोजी स्मरणपत्र पाठविण्यात आले. |

**विवेचन**

माहिती अधिकार अर्जावरील सुनावणी मध्ये अपिलार्थी यांनी माहिती उपलब्ध करून दिली नाही म्हणून अपील दाखल केल्याचे सांगितले यावर जन माहिती अधिकारी यांना विचारणा केली असता सदर अर्जात नमूद केल्याप्रमाणे जागेवर तात्काळ प्रत्यक्ष कारवाई करून छाटणी केलेल्या फांद्या व पालापाचोळा सोसायटी च्या बाहेरुन उचलण्याची व्यवस्था करण्यात येईल असे सांगितले, व तसे अर्जदार यांना उत्तर पाठविण्यात येईल असे सांगितले. यावर अपिलार्थी यांचे समाधान झाले असून अपिलार्थी यांनी सुनावणी दरम्यान छाटणी केलेल्या फांद्या उचलण्यात याव्यात त्याबाबत कारवाई करण्यात यावी असे सांगितले.

**-: आदेश :-**

जन माहिती अधिकारी तथा उद्यान अधीक्षक श्री. विजय नेवसे यांनी माहिती अधिकार अर्जात नमूद केल्याप्रमाणे कारवाई करावी व तसे अर्जदार यांना कळविण्यात यावे, अर्जदारास माहिती विनामुल्य उपलब्ध करून देण्यात यावी व त्याबाबतचा अहवाल आमचेकडे सादर करावा.

(हेमंत मा. किरूळकर)
अपिल प्राधिकारी तथा महा.सहा.आयुक्त
कोंढवा-येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालय
पुणे महानगरपालिका

दिनांक आणि ठिकाणः ३०/०८/२०२४ ,पुणे.

टीप :- १. सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास माहिती अधिकार अधिनियम कलम १९(३)नुसार मा.आयुक्त,राज्य माहिती आयोग,नविन प्रशासकिय इमारत,विधानभवन समोर पुणे ४११००१ यांचेकडे अपिल करता येईल.



F:\RTI\first Appeal\संदीप पवार\sunavani४०४९.docx